
# ६. या झोपडीत माझ्या

भाग – २

**राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज –** माणिक बंडोजी ठाकूर (१९०९–१९६८) : संतकवी, समाजसुधारक. अंधश्रद्धा, जातिभेद, धर्मभेद यांसारख्या समाजविघातक गोष्टींवर हल्ले चढवून त्यांनी देशभक्ती, अहिंसा व आत्मसंयम यांचे पाठ दिले. गावागावातून 'गुरुदेव सेवा मंडळे' स्थापन केली. या कार्याबद्दल भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. 'अनुभवसागर भजनावली', 'सेवास्वधर्म', 'राष्ट्रीय भजनावली' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. शिक्षण, भेदाभेद व अस्पृश्यता निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता, सर्वधर्मसमभाव यांविषयी कळकळीचे आवाहन करणारा व अज्ञानी जनतेला वात्सल्ययुक्त भूमिकेतून लोकशिक्षण देणारा त्यांचा 'ग्रामगीता' हा ग्रंथ सर्वत्र आदराने वाचला जातो.

सुख आणि आर्थिक सुबत्ता यांचा काही संबंध नसतो, कारण सुख-दु:ख या मानवी मनाच्या भावभावना आहेत. लहानशा झोपडीतही शांतिसुखाचा अनुभव व आनंद सदैव कसा मिळतो, याचे वर्णन प्रस्तुत कवितेत केले आहे.



राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या

भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या

पहारे आणि तिजोऱ्या, त्यांतूनि होती चोऱ्या
दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या

जाता तया महाला, 'मज्जाव' शब्द आला
भीती न यावयाला, या झोपडीत माझ्या

महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
आम्हां जमीन माने, या झोपडीत माझ्या

येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोजा, या झोपडीत माझ्या


पाहूनि सौख्य माते, देवेंद्र तोहि लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या

## स्वाध्याय

**प्र. १. कवितेत आलेल्या आशयानुसार पुढील मुद्द्यांतील फरक सांगा.**

| झोपडीतील सुखे | महालातील सुखे |
|---|---|
| (१) .................... | (१) .................... |
| (२) .................... | (२) .................... |

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**




**प्र. ३. 'झोपडीत निसर्गाचे सान्निध्य आहे', हे पटवून देणारी उदाहरणे लिहा.**


**प्र. ४. 'तिजोरी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**प्र. ५. काव्यसौंदर्य.**

(अ) 'पाहूनि सौख्य माते, देवेंद्र तोहि लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) 'दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या' या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.

- **झोपडी व महाल यांच्यातील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.**

**झोपडी :** ..........................................................................

**महाल :** ..........................................................................

**झोपडी :** ..........................................................................

**महाल :** ..........................................................................

**झोपडी :** ..........................................................................

**महाल :** ..........................................................................

**झोपडी :** ..........................................................................

**महाल :** ..........................................................................

- **उजळणी– तक्ता पूर्ण करा.**


| **उपमेय**–आईचे प्रेम    **उपमान**–सागर | | **उपमेय**–आंबा    **उपमान**–साखर |
|---|---|---|
| उपमा | आईचे प्रेम सागरासारखे असते. | |
| उत्प्रेक्षा | आईचे प्रेम म्हणजे जणू सागरच. | |
| रूपक | वात्सल्यसिंधू आई. | |

- **म्हण म्हणजे काय ?**

‘म्हण’ हा विषय मनोरंजक आहे. आपण व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या म्हणी – उदा. –‘करावे तसे भरावे’ किंवा ‘गाढवाला गुळाची चव काय’ यांसारख्या म्हणींचा अभ्यास केला तर, ‘म्हण म्हणजे शहाणपणाने भरलेले वचन.’ या ज्ञानाचा आपल्याला बोलताना, लिहिताना अनेक प्रसंगी उपयोग करता येतो आणि आपले बोलणे, लिहिणे अधिक प्रभावशाली करता येते. भाषेला सौंदर्य प्राप्त होते, किंबहुना त्या भाषेची ती भूषणे आहेत. शब्द हे वज्राहूनही कठीण असतात आणि फुलाहूनही कोमल असतात, असे म्हटले जाते ते शब्दांच्या अर्थासाठी.

‘म्हण’ म्हणजे लक्षात ठेवण्यास योग्य असे ज्ञानवचन.
उदा., ‘दिव्याखाली अंधार’ यासारख्या म्हणीतून ज्ञान साठवलेले आहे. अनुभव आणि शहाणपण या म्हणीच्या अर्थातून डोकावतेच.

‘म्हणीचा’ प्राण आहे ‘लोकसंमती’, म्हणीचा वारंवार उपयोग करणे हेच त्या वचनातील ज्ञानाच्या खरेपणाचे निदर्शक आहे.
उदा.,‘थेंबे थेंबे तळे साचे’ या म्हणीतील अर्थ थोडे थोडे एकत्र करूनच साठा तयार होतो. म्हणीचा बोलताना, लिहिताना केला जाणारा वापर म्हणजे जनसंमती होय.




‘म्हण’ चटकदार पद्धतीने ज्ञान देते. तिच्या शब्दात खुमारी व अंत:करणावर छाप पाडण्याची किमया असते.
उदा.,‘चोराला चावला विंचू चोर करीना हूं की चूं’ निंद्य कर्म करणाऱ्यावर एखादे संकट आले तर ते बाहेर सांगता येत नाही.

‘म्हणी’त अर्थाच्या मानाने शब्द थोडे असतात. म्हणीतील अर्थसंकोच वारंवार वापराने अशिक्षितालाही कळतो व ती म्हण सर्वश्रुत होते.
उदा., ‘नाकापेक्षा मोती जड’ एखाद्याने आपल्या योग्येतपेक्षा अधिक डामडौल केला तर तो हास्यास्पद होतो.